आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

११ सप्टेंबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- जगातल्या सर्व उपकरणांमध्ये भारतानं बनवलेली चीप असायला हवी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची अपेक्षा

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राज्यातल्या आशा बावणे यांच्यासह १५ जणांना राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार प्रदान

- सायबर गुन्हेगारी आणि आर्थिक फसवणुकीसाठी वापरलेले एक कोटींहून अधिक मोबाईल नंबर आणि सव्वा २ लाखांहून अधिक मोबाइल हँडसेट दूरसंचार मंत्रालयाकडून निकामी

- मुंबई महानगर प्रदेशाला विकासाचे क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी राज्य सरकारकडून मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना

**आणि**

- चंद्रपूरमध्ये विजेचा धक्का बसून चार जण ठार, १ युवक जखमी

**<><><><><>**

जगातल्या सर्व उपकरणांमध्ये भारतानं बनवलेली चीप असायला हवी असं आपलं स्वप्न असून सेमिकंडक्टरचं पावर हाऊस होण्यासाठी जे जे आवश्यक आहे ते ते भारत करेल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. प्रधानमंत्र्यांनी सेमिकॉन इंडिया २०२४ चं ग्रेटर नोएडा इथं आज उद्घाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते.

## होल्ड - प्रधानमंत्री

सेमिकंडक्टर कंपन्यांनी भारतात गुंतवणूक करण्याचं आवाहन त्यांनी केलं. भारतात गुंतवणूक करण्याची हीच योग्य वेळ आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. या दशकाच्या शेवटापर्यंत इलेक्ट्रॉनिक उद्योग क्षेत्रातली उलाढाल ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचं सरकारचं ध्येय असून यामुळे ६० लाख रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. एकेकाळी मोबाईल आयात कराणारा भारत आता मोबाईल निर्मिती करणारा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा देश बनल्याचंही त्यांनी सांगितलं.

सरकारनं डिजिटल इंडिया मोहिमेद्वारे सामान्य लोकांच्या हातात तंत्रज्ञान दिल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. सेमिकंडक्टर उद्योगाची वाढ झाल्यानं यात आणखी वाढ होईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार २०२४ वितरण सोहळा आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते १५ जणांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात महाराष्ट्रातील आशा बावणे यांचा समावेश आहे.

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं १९७३ मध्ये राष्ट्रीय फ्लोरेंस नाइटिंगेल पुरस्कार देण्यास सुरुवात केली. हे पुरस्कार उल्लेखनीय काम करणाऱ्या परिचारिकांना दिला जातो.

**<><><><><>**

सायबर गुन्हेगारी आणि आर्थिक फसवणुकीसाठी वापरलेले एक कोटींहून अधिक मोबाईल कनेक्शन बंद केल्याची माहिती दूरसंचार विभागानं दिली आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यात वापरलेले २ लाख २७ हजार मोबाईल संच ही ब्लॉक केले आहेत. **‘संचार साथी’** च्या मदतीनं अशा मोबाईल क्रमांकाची माहिती मिळवल्याचं दूरसंचार विभागानं सांगितलं.

गेल्या पंधरवड्यात साडेतीन लाखांहून अधिक स्पॅम क्रमांक खंडित केले असून ५० संस्थांना काळ्या यादीत टाकलं आहे. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण-ट्रायच्या सहकार्यानं दूरसंचार सेवा अधिक सक्षम तसंच वेगवान गतीच्या इंटरनेटसह स्पॅम मुक्त सेवा ग्राहकांना देण्यासाठी अनेक उपाय योजना सुरू केल्या आहेत.

**<><><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते, लोकप्रतिनिधी राहुल गांधी परदेशात जाऊन भारताची, आणि इथल्या नागरिकांची बदनामी करतात, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. आरक्षण संपवण्याचा मनसुबा राहुल गांधी यांनी अमेरिकेत व्यक्त केला आहे. मात्र, शिवसेना आणि महायुतीतले सहकारी पक्ष आरक्षणाच्या बाजूने असून, आम्ही आरक्षण संपवू देणार नाही, असं त्यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

तर, राहुल गांधी नेहमीच देशविरोधी विधानं करत असतात. असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या

वेळी राहुल गांधी आणि काँग्रेसनं आरक्षणाच्या मुद्यावरुन खोटा प्रचार केला. मात्र आता खरा चेहरा समोर आला आहे, असं फडनवीस यांनी म्हटलं आहे.

राहुल गांधी परदेशात भारतीय लोकशाहीची बदनामी करत असल्याची टीका केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनीही केली आहे.

**<><><><>**

मुंबई महानगर प्रदेशाला विकासाचे क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी नीती आयोगानं दिलेल्या शिफारशीची अंमलबजावणीसाठी राज्य सरकारनं मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. या संदर्भातील अध्यादेश काल राज्य सरकारनं जारी केला.

मुंबई आणि महानगर परिसराचं सध्याचं उत्पादन १४० अब्ज डॉलर इतकं असून २०३० पर्यंत हे उत्पादन ३०० अब्ज डॉलर्स इतकं करण्याचं उद्दिष्ट्य या समितीपुढे ठेवलं आहे. या समितीत मुख्य सचिवांसह २२ सदस्य आहेत. नीती आयोगानं केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणार आहे. तसंच थेट परकीय गुंतवणुकीला आकर्षित करणं आणि ती टिकवून ठेवणं, स्टार्टअप आणि रोजगार क्षमतेला चालना देणं या जबाबदाऱ्या समितीवर सोपवल्या आहेत. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या समितीत कोणत्याही लोकप्रतिनिधींचा समावेश केलेला नाही.

**<><><><>**

चंद्रपूर जिल्ह्याच्या ब्रम्हपुरी तालुक्यातल्या गणेशपुर इथं विजेचा धक्का बसून चार जण ठार तर एक शेतकरी युवक जखमी झाल्याची घटना घडली

आहे. जखमी युवकावर स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत. ही घटना वन्य प्राण्यांपासून शेत-पिकाचं रक्षण करण्यासाठी लावलेल्या तारांच्या कुंपणामुळं घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

**<><><><><>**

**भंडारा** जिल्ह्यात जोरदार पाऊस सुरु असून नदी, नाले ओसंडून वाहत आहेत. जिल्हा प्रशासनानं शाळा-महाविद्यालयाला सुट्टी दिली आहे. वैनगंगा नदीला पूर आला असून तिने धोक्याची पातळी ओलांडली आहे. या नदीवर सुरु असलेल्या पुलाच्या बांधकामासाठी वापरली जाणारी क्रेन आठ किलोमिटर पर्यंत पुराच्या पाण्यात वाहून गेली होती. नदी नाल्यांना पूर आल्यामुळं अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. गोसीखुर्द धरणाचे २७ गेट दीड मीटर तर ६ गेट एक मीटर उघडण्यात आले आहेत. त्यामुळं नदीकाठावर असलेल्या भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यातल्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

जायकवाडी प्रकल्प तसंच नाथसागर जलाशयातून विसर्ग सुरू करण्यात आल्यानं गोदावरीकाठच्या गावांमध्ये आवश्यक उपाययोजना करण्याच्या सुचना बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. त्या व्यतिरिक्त गेवराई आणि माजलगांव तालुक्यासाठी दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून पुरामुळं बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना त्वरीत मदत पोचवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

गुजरातमध्ये कच्छ विभागातल्या अबदासा आणि लाखपत इथं गेल्या काही आठवड्यात एका अज्ञात तापामुळे अकरा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती गुजरात सरकारने दिली आहे. राज्यात मागच्या आठवड्यात झालेल्या सोळा मृत्यूंपैकी ११ मृत्यू अज्ञात तापामुळे झाले असून पाच मृत्यू इतर आजारामुळे झाल्याचं राज्याचे आरोग्य मंत्री ऋषीकेश पटेल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यातल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी शासनानं देशाभरातल्या तीर्थक्षेत्रांची यात्रा करण्याची संधी उपलब्ध केली आहे. ‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने’अंतर्गत राज्यातून पहिली रेल्वेगाडी अयोध्या दर्शनासाठी धावणार आहे. ही रेल्वेगाडी नांदेडहून २० ते २२ सप्टेंबरपर्यंत निघण्याची शक्यता असून, यासाठी आवश्यक ती सर्व तयारी प्रशासनाकडून करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली. अयोध्येसमवेत नांदेडहून अमृतसर इथल्या सुवर्णमंदिर दर्शनासाठीही तयारी केली जात आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यातून ३० हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. या योजनेअंतर्गत ज्येष्ठांना विविध आवश्यक साहित्य खरेदीसाठी तीन हजार रुपये अनुदान दिलं जाणार आहे.

**<><><><><>**

विदर्भातल्या अष्टविनायकांपैकी एक गणपती भंडारा जिल्ह्यातल्या पवनी शहरात आहे. पंचमुखी गणेश,रांझीचा गणेश आणि धरणीधर गणेश अशे तीन

मानाचे गणपती या ठिकाणी असून या देवस्थानांचा इतिहास जुना आहे. पूर्वीच्या काळात पवनी शहरात यायला नदीपात्र हा एकच मार्ग असल्यानं पवन राजानं नदीकाठावर असलेल्या बांबूच्या म्हणजे रांझीच्या खाली ५ फूट उंच गणेशाची मूर्ती स्थापन केली. कालांतरानं नदी काठावर बांबूचं बन वाढल्यानं लोकांनी या देवस्थानाकडे पाठ फिरविली होती. गावातीलच काही तरुणांनी स्वच्छता करून परत श्रीगणेशाची पूजाअर्चा सुरु केली आहे .

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीने साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, बेल्जियममधल्या गणेशोत्सवाविषयी.

**<><><><><>**

लातूर शहरातल्या घनकचरा व्यवस्थापनासाठी नेमलेल्या जन-आधार सेवाभावी संस्थेचं कंत्राट संपल्यामुळे शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग दिसून येत होते. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर घनकचरा व्यवस्थापनासाठी नवी एजन्सी नेमण्याची प्रक्रिया लातूर महानगरपालिका प्रशासनानं सुरू केली आहे.

**//<><><><><>//**